स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्रराज्य, मुंबई
यांचेकार्यालय तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड (प.), मुंबई-४००००२

GOVERNMENT OF MAHARASHTRA
DEPARTMENT OF FISHERIES
COMMISSIONER OF FISHERIES, MAHARASHTRA STATE,MUMBAI
Taraporevala Aquarium, Netaji Subhash Road,Charni Road (W), Mumbai 400002
दूरध्वनी क्र.२२८२१२३९Tel.No.22821239

Email :-commfishmaha@gmail.com Website:-http://fisheries.maharashtra.gov.in


जा.क्र.मत्स्य/प्रशा/१४२२३८/४७/२०२३ दिनांक : ३०/०५/२०२३

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (निपास), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार दाखल करण्यात आलेले प्रथम अपिल सुनावणी आदेश.**

**(प्रथम अपिल क्र. ३ /२०२३)**

श्री. संपत वामन पवार : अपिलार्थी
रा. हिरेनगर, पो. हिसवळ (बु),
ता. नांदगांव, जि. नाशिक

**विरुद्ध**

जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय,
नाशिक विभाग, नाशिक

१. **अपिलाची पार्श्वमुमी :**

श्री. संपत वामन पवार यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार दिनांक १३/०४/२०२३ च्या अर्जान्वये ( प्राप्त दिनांक १८/०४/२०२३) प्रथम अपिल दाखल केले आहे. सदर प्रथम अपिल अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०/०५/२०२३ रोजी दुपारी १२.३० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती. या सुनावणी बाबतची नोटीस संबधीतांना जा.क्र. मत्स्य/प्रशा/१४२२३८/४७/२०२३, दिनांक २६/०४/२०२३ च्या पत्रान्वये पाठविण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक, श्री. सं. पां. वाटेगांवकर सुद्धा उपस्थित होते.

२. अर्जदार यांचे म्हणणे पुढील प्रमाणे :

श्री. संपत वामन पवार यांनी दिनांक २७/०२/२०२३ रोजीचा अर्ज (प्राप्त दि. २८/०२/२०२३) जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडे माहिती अधिकारांतर्गत सादर केला होता. सदर अर्जान्वये, त्यांनी “श्री. संपत पवार यांचे दि. ०८/०२/२०२३ रोजी केलेल्या तक्रार अर्जाबाबत मुद्देनिहाय माहिती देणेबाबत” मागणी केली होती. उपरोक्त माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा

-२-

प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांनी सुनावणीपुर्वी त्यांचे लेखी म्हणने सुनावणीकरिता सादर केले आहे. अर्जातील विषया संदर्भात माहिती, अपिलार्थीस पत्रान्वये माहिती अर्जात नमूद विकल्पानुसार व्यक्तीशः दिनांक २८/०३/२०२३ रोजी (माहिती अधिकार अर्ज प्राप्त दिनांकाअपासुन २९ व्या दिवशी) अदा करण्यात आली असल्याचे नमुद केले आहे. मात्र अर्जदार यांनी दि. १३/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकाराअंतर्गत प्रथम अपिल दाखल केले आहे. सदर अर्जातील अर्जदार यांना नमूद मुद्दयांवर म्हणणे व्यक्त करण्यास प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यावेळी सदर माहिती वेळेत दिली नाही व अपुर्ण चुकीची दिशाभूल करणारी दिली असे सांगितले.

३. गैरअर्जदार, जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांचे म्हणणे पुढील प्रमाणे :

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांनी नमुद केले की, अर्जदार यांनी माहिती अर्जान्वये केलेल्या मागणीनुसार अर्जदार यांना विहीत मुदतीत सदर दि. ०८/०२/२०२३ च्या पत्रावर (प्राप्त दि. २८/०२/२०२३) दि. २८/०३/२०२३ अखेर, माहिती दिलेले दिनांकापर्यंतची झालेली कार्यवाही बाबत अभिलेख उत्तर स्वरूपात मागणीप्रमाणे सत्यप्रत करून विहित मुदतीत पाठविण्यात आलेले आहे. याबाबतच्या पत्राची पोच सुनावणी दरम्यान निदर्शनास आणून दिली.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने फौजदारी गुन्हे दाखल कारवाई बाबत माहिती दिली नसल्याचे निदर्शनास आणले. त्यावर दि. २८/०३/२०२३ पर्यंत झालेल्या कार्यवाहीचे अभिलेख आपणास दिलेले आहेत व मुद्दा क्र. ३ बाबत जनमाहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक हे सक्षम प्राधिकार नसल्याचे अर्जदारास, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले.

वरील अपिलाची पार्श्वभुमी व वस्तुस्थिती विचारात घेता प्रथम अपिलीय अधिकारी पुढील निष्कर्षाप्रत होतात.

## निष्कर्ष

प्रकरणाची कागदपत्रे आणि सुनावणीच्या वेळी करण्यात आलेले युक्तिवाद यांचा विचार करता असे दिसुन येते की,

१. अपिलार्थीनी केलेल्या मूळ माहीती अर्जाच्या अनुषंगाने विहीत कालावधीत दिनांक २८/०३/२०२३ च्या पत्रान्वये अर्जदाराला वस्तुस्थितीदर्शक उत्तर देण्यात आलेले आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी विहीत कालावधीत माहिती दिली असल्याने कलम ७ (१) (अ) चे उल्लंघन झालेले नाही.

३. अपिल अर्जात नमूद माहिती वेळेत दिली असल्याने अर्जात नमूद इतर शास्तीबाबत कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

४. माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) व २० (२) व कलम १८(३) (ख) बाबत कार्यवाहीचे अधिकार मा. राज्य माहिती आयोग यांना आहेत.

५. मुळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या अनुषंगाने "मत्स्यव्यवसाय विभागातील जबाबदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे अशी मागणी केली आहे" या बाबत, फौजदारी गुन्हे दाखल करणे ही बाब जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांच्या अधिकार क्षेत्रात येत नाही.

**आदेश :**

मी, श्री. यु. आ. चौगले प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (निपास), महाराष्ट्र राज्य, मुंबई, दि.१०/०५/२०२३ रोजी घेतलेल्या प्रथम अपिल सुनावणीचा आदेश पारीत करीत आहे.

१. जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक यांनी केंद्रिय माहिती अधिनियम २००५ नुसार माहिती बाबत अर्जदारास मागणीनुसार झालेल्या कार्यवाहीबाबत अभिलेख उत्तर स्वरुपात सत्यप्रत करुन विहीत कालावधीत लेखी कळविले आहे. तरी अपिलार्थी यांनी दाखल केलेले प्रथम अपिल क्र. ३ /२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

२. या निर्णयामुळे समाधान न झाल्यास, खालील प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ९० दिवसांच्या आत द्वितीय अपील दाखल करता येईल.

मा. राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक.
पिनॅकल मॉल, चौथा मजला,
त्र्यंबक नाका सिग्नल जवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२.

(यु. आ. चौगले)
प्रथम अपिलीय अधिकारी
तथा सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (निपास),
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१) श्री. संपत वामन पवार, रा. हिरेनगर, पो. हिसवळ (बु), ता. नांदगांव, जि. नाशिक

२) जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक विभाग, नाशिक.

३) निवडनस्ती.